पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.मातंवि/ 8/कावि/365/2018
दिनांक-15/ 9 /2018

**विषय:- महापालिका संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भः- 1) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/16/2016, दि. 13/01/2016
2) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/77/2016, दि. 01/04/2016
3) परिपत्रक क्र. मातंवि/08/कावि/369/2016, दि. 10/02/2017
4) परिपत्रक क्र. मातंवि/13/कावि/47/2017, दि. 17/04/2017
5) परिपत्रक क्र. मातंवि/8/कावि/113/2018, दि. 14/03/2018

परिपत्रक,

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत नागरिकांना महापालिके संबंधित माहिती तत्काळ उपलब्ध होण्याचे दृष्टीने महापालिकेच्या विविध विभागांची माहिती म.न.पा.चे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. त्या दृष्टीने उपरोक्त संदर्भ क्र. 1 ते 5 अन्वये सर्व विभागांना त्यांचे विभागाशी संबंधित माहिती मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध / अद्ययावत ठेवणेबाबत कळविणेत आलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळावर मनपाचे विविध विभागांशी संबंधित माहिती (उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश, करारनामा, विविध योजना, अंतर्गत परिपत्रके व आदेश, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, **RTI** अंतर्गत माहितीचे प्रकटीकरण इ.) प्रसिद्ध करणे व ती अद्ययावत ठेवणे कामी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रशिक्षण देऊन विभाग निहाय **Login** व **Password** देणेत आलेले आहेत.

**तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची माहिती संबंधित विभागांकडुन वेळोवेळी प्रसिद्ध / अद्ययावत केली जात नसल्यामुळे सन्मा. नगरसदस्य व नागरिक यांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. परिणामी त्यांना सदरची माहिती प्राप्त करणेसाठी माहिती अधिकार अंतर्गत माहिती मागवावी लागते. विशेषकरुन "आरोग्य मुख्य कार्यालय", "माध्यमिक शिक्षण विभाग" व "शिक्षण मंडळ" तसेच इतर विभागांनी उपरोक्त माहिती प्रसिद्ध न केलेबाबत विविध तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.**

तसेच मनपाचे विविध विभाग व विभाग प्रमुख याबाबतची माहिती माहिती व तंत्रज्ञान विभागाकडुन संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाते. विभाग प्रमुखांची बदली / सेवानिवृत्त झालेनंतर नव्याने विभाग प्रमुखांची माहिती उदा. विभाग प्रमुखांचे नाव, पदनाम, फोटो, संपर्क क्रमांक तसेच अधिकारी / कर्मचारी माहिती व तपशिल इत्यादी मध्ये काही बदल असल्यास सदरची माहिती संबंधित विभागांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविणे व अद्ययावत करुन घेणे आवश्यक आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना कळविणेत येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर आपले विभागासंबंधी निविदा / कोटेशन नोटीस, कामाचे आदेश, करारनामा, नागरिकांची सनद, अंतर्गत परिपत्रके व आदेश, नागरिकांना देणेत येणा-या सेवा, RTI अंतर्गत माहितीचे प्रकटीकरण करावयाच्या दृष्टीने प्रसिद्ध करावयाची माहिती तसेच विभाग प्रमुखांची माहिती इ. संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची माहिती संबंधित विभागा मार्फत दिनांक 25/09/2018 पर्यंत प्रसिद्ध करणे व ती वेळोवेळी अद्ययावत होईल याबाबत कार्यवाही करावी.

सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क साधुन पुनःश्च प्रशिक्षण घेऊन उपरोक्त माहिती संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध / अद्ययावत ठेवणेबाबत दक्षता घेणेत यावी. संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी मुदतीत प्रसिद्ध / अद्ययावत न झाल्यास याबाबत सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांचेवर राहिल याची नोंद घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,
सर्व संबंधित विभाग